**V.P.M's**

# B. N. Bandodkar College of Science, Thane

## Junior College

## F.Y.J.C First Terminal Examination September 2018

## Subject:Marathi

**Day: Friday**
**Date: 21.09.2018**
**Note:** सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

**Time: 10.00 am to 11.00 am**
**Marks: 25**

कृती १ अ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० शब्दात कल्पनाविस्तार करा. ०६

१. आरोग्यम् धनसंपदा.

२. वाचाल तर वाचाल.

३. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे.

ब) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

माप ओलांडून तुझ्या घरात आले
माझे असलेले सर्व काही पुसले गेले
माझी डिग्गर,भातुकलीतील बाहुली,चाफ्याचे झाड
अंगणाल दोरीवर उड्या मारणारा माझा अल्लडपणा
सारी काही माहेरीच सोडून आले
तूच मंगळसूत्र गळयात बांधले
तुझेच घर आणि तूच दिलेले नाव
जणू काही परकाया प्रवेश
पत्नी,आई,सून, वहिनी
माझे अस्तित्व येथे असेच वाटले गेले
मान्य आहे तू साथ दिलीस
दुःख तसे कसलेच नाही
फक्त एकच खंत आहे
माझे जग विसरून मी तुझी झाले
पण तू कधी मला विचारले नाहीस
की मी माझ्या जगात कशी होते ?

-मिलिंद लांजेवार

१. कवितेतील स्त्री माहेरी सोडून आलेल्या गोष्टी ०१

१) [ ] २) [ ]

२. विवाहित स्त्रीने परकाया प्रवेश करून निभावलेल्या भूमिका (कोणत्याही दोन) ०१

१) [ ] २) [ ]

३. आधुनिककाळात जगात / भारतामध्ये स्त्री-पुरुष समानता कोणकोणत्या स्तरावर जाणवते याविषयी तुमचे मत स्पष्ट करा. ०३

कृती २ अ) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. खालील ऐतिहासिक शब्दांना प्रचलित समानार्थी शब्द लिहा. ०२

| ऐतिहासिक शब्द | प्रचलित समानार्थी शब्द |
|---|---|
| दरज | |
| कुसू | |
| उदक | |
| खासा | |

P.T.O

गडाची राखण म्हणजे कलारग्याची झाडी, ते झाडी प्रयत्नें वाढवावी. त्यामध्यें एक काठीही तोडों न दयावी. बलकुबलीस त्या झाडीमध्यें हशम बंदुके घालावेया कारणाजोगे असों दयावे. गडासभोंवती नेहमी मेटें असावी. घेरियाची वस्ती करीत जावी. घस्तीचा जाब मेटकरी यांणी देत जावा. गडाखालतें इमारतीचें घर किंवा घराभोंवतें दगडाचे कुसूं सर्वथा असों न दयावे. तसेंच गडावर आधीं उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाहीं आणि तें स्थळ तो अवश्यक बांधणें प्राप्त झालें तरी
आधीं खडक फोडून तळीं, टांकी पर्जन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशीं मजबूत बांधावीं. गडावरी झराही आहे, जसें तसें पाणीही पुरतें, म्हणून तितकियावरीच निश्चिंती न मानावी. किंनिमित्य कीं, झुंजामध्यें भांडियांचें आवाजाखाली झरे स्वल्प होतात, आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हां संकट पडतें. याकरितां तसे जागीं जखिरीयाचे पाणी म्हणून दोन चार टाकीं तळीं बांधावीं. त्यांतील पाणी खर्च होऊं न दयावे, गडाचें पाणी बहुत जतन राखावें, गडावरी राजमंदिरविरहित थोर इमारतीचें घर बांधो नये. राजमंदिरासही भिंती इटांच्या बांधोन त्यास चुना दाट गच्च घालावा. घरात कोठें उंदीर, विंचू, किडा, मुंगी राही अशी दरज न ठेवावे. घरास कुसूं पाहिजे ते निरगुंडी आदिकरून झाडांचे पातळ घालावें. गडकरी यांणी राजमंदीर म्हणून खालीं न ठेवावे. सर्वकाळ वस्ती करून धुरूं करून घर शाबूत राही, जीव जंतु न राही तें करावे.

२. **घर शाबूत राहण्याचे दोन उपाय ः-** ०१

३. पाणी वाचवण्यासाठी आजच्या काळात कोणती काळजी पाहिजे याबाबत सुमारे १२ ते १५ ओळीत स्वमत लिहा. ०४

कृती ३ **खालील काव्यवेचाच्या आधारे कृती करा.**

१. मनुष्य जीवनाचे चार आश्रमः ०२

**जोडोनियां धन**

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें | उदास विचारें वेच करी ||धृ||
उत्तम चि गती तो एक पावेल | उत्तम भोगील जीव खाणी ||१||
परउपकारी नेणें परनिंदा | परस्त्रिया सदा बहिणी माया ||२||
भूतदया गाईपशूचें पालन | तान्हेल्या जीवन वनामाजी ||३||
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट | वाढवी महत्व वडिलांचें ||४||
टुका हाणे हे चि आश्रमाचें फळ | परमपद बळ वैराग्याचें ||५||

**- संत तुकाराम**

२. परउपकारी नेणे परनिंदा | परस्त्रिया सदा बहिणी माया || या ओळीचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा. ०२

३. संताची शिकवण आजच्या काळात कशा प्रकारे महत्वपूर्ण ठरते ते सुमारे ८ ते १० ओळीत लिहा. ०३

~*~*~*~*~*~